वाचा :-

१)महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.ममाअ/२००२/प्र.क्रं.१२७/०२/५/ दि.१४.०८.२००३.

२) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.केमाअ/२००५/प्र.क्रं.१९०/०५/५/ दि.१८.०६.२००५

३) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.केमाअ/२००५/प्र.क्रं.४३०/०५/५ दि.२०.०१.२००६.

४)कार्यालयीन आदेश क्र. नांवाशमनपा/साप्रवि/६२४६/२०२२, दि.०४.०८.२०२२

५) कार्यालयीन आदेश क्र. नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-१/६३५/२०२५, दि.१५.०४.२०२५

**"आदेश"**

जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/ 4750 /२०२५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक :- 13 JUL 2025

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार २००५ हा संपुर्ण भारतात लागु झाल्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत विविध विभागाची माहिती देण्यासाठी यापूर्वी संदर्भ क्र.४ अन्वये सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांचे नियुक्ती बाबत आदेश निर्गमीत करण्यात आले होते.

तथापि संदर्भ क्र.०५ अन्वये विभागाच्या कामकाजात झालेल्या बदलानुसार प्रशासकीय कारणास्तव यापुर्वी निर्गमित करण्यात आलेले आदेश अधिक्रमीत करुन, यापुढे खालीलप्रमाणे सुधारणा करुन सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | सहा.जन माहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन विभाग/ आस्थापना विभाग आवक-जावक (एक खिडकी योजना कक्ष)/ दुरध्वनी विभाग | अधिक्षक तथा वरिष्ठ लिपीक/ मुख्य टेलिफोन ऑपरेटर | सहाय्यक आयुक्त (साप्रवि/आस्थापना) | संबंधित उपआयुक्त |
| २ | घनकचरा व्यवस्थापन विभाग (स्वच्छता) (मुख्य कार्यालय) व स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष | वरिष्ठ लिपीक /लिपिक | सहाय्यक आयुक्त (घनकचरा) | संबंधित उपआयुक्त |
| ३ | पशुशल्यचिकित्सक विभाग | लिपिक | पशुशल्य चिकित्सक | संबंधित उपआयुक्त |
| ४ | विधि व न्याय विभाग | वरिष्ठ लिपिक | सहाय्यक विधि अधिकारी | संबंधित उपआयुक्त |
| ५ | लेखा व वित्त विभाग | उप लेखापाल / वरिष्ठ लिपीक (लेखा) | लेखा व वित्त अधिकारी | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |

04.07.25

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मुख्य लेखा परिक्षण विभाग | लेखा लिपिक | उप लेखा परिक्षक | मुख्य लेखा परिक्षक |
| ७ | सचिव विभाग | वरिष्ठ लिपिक/लिपिक | नगरसचिव | उपआयुक्त (प्रशासन) |
| ८ | अग्निशमन विभाग | वरिष्ठ लिपिक /लिपिक | अग्निशमन केंद्र अधिकारी | संबंधित उपआयुक्त |
| ९ | सुरक्षा /मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन/नियंत्रण कक्ष | वरिष्ठ लिपिक/लिपिक | आपत्ती व्यवस्थापन अधिकारी | संबंधित उपआयुक्त |
| १० | माहिती व जनसंपर्क विभाग | वरिष्ठ लिपिक/लिपीक | माहिती व जनसंपर्क अधिकारी | संबंधित उपआयुक्त |
| ११ | निवडणुक विभाग, जनगणना विभाग,समाज विकास विभाग,महिला शिक्षण व बालकल्याण विभाग/दिव्यांग विभाग राष्ट्रीय शहर उपजिविका अभियान कक्ष (NULM) | वरिष्ठ लिपिक तथा लिपीक | सहाय्यक आयुक्त/नोडल अधिकारी/ व्यवस्थापक | संबंधित उपआयुक्त |
| १२ | अभिलेख विभाग | वरिष्ठ लिपिक/लिपीक | अभिलेख पर्यवेक्षक | संबंधित उपआयुक्त |
| १३ | क्षेत्रिय कार्यालय क्र.१ ते ६ | अधिक्षक /वरिष्ठ लिपीक | क्षेत्रिय अधिकारी | संबंधित उपआयुक्त |
| १४ | कर विभाग | वरिष्ठ लिपीक | सहाय्यक आयुक्त | संबंधित उपआयुक्त |
| १५ | माहिती व तंत्रज्ञान विभाग | वरिष्ठ लिपीक/लिपीक | सिस्टिम मॅनेजर | समन्वय अधिकारी |
| १६ | आरोग्य,रुग्णालय/नागरी आरोग्य केंद्र विभाग व मलेरीया विभाग,औषधी भांडार | वरीष्ठ लिपीक तथा वरिष्ठ क्षेत्रकार्यकर्ता /औषध निर्माता/मिश्रक | वैद्यकीय अधिकारी/ जीवशास्त्रज्ञ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १७ | शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक विभाग, ग्रंथालय विभाग | वरिष्ठ लिपिक/ सहाय्यक ग्रंथपाल | शिक्षणाधिकारी/ क्रिडा अधिकारी/ ग्रंथपाल | संबंधित उपआयुक्त |
| १८ | उद्यान विभाग व देशी वृक्ष लागवड संवर्धन विभाग | वरिष्ठ लिपिक/लिपीक | मुख्य उद्यान अधिक्षक | संबंधित उपआयुक्त |
| १९ | भुसंपादन विभाग | अधिक्षक तथा वरीष्ठ लिपीक | विशेष कार्यसन अधिकारी | संबंधित उपआयुक्त |
| २० | बिएसयुपी / पीएमवाय विभाग/रमाई आवास योजना | अधिक्षक तथा वरिष्ठ लिपीक/कनिष्ठ अभियंता | विभागप्रमुख/ उपअभियंता (बिएसयुपी /पीएमवाय/रमाई आवास योजना) | संबंधित उपआयुक्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | सार्वजनिक बांधकाम विभाग व नियोजन | कनिष्ठ अभियंता/वरिष्ठ लिपिक | उपअभियंता (साबांवि) | कार्यकारी अभियंता (साबांवि) |
| २२ | अभियांत्रिकी पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभाग (मुख्य कार्यालय) | अधिक्षक तथा वरीष्ठ लिपीक | उपअभियंता (पापु व मनि) | कार्यकारी अभियंता (पापु व जनि) |
| २३ | पाणी पुरवठा व जलनिस्सारण विभाग (क्षे.का.क्र.१ ते ४) | कनिष्ठ अभियंता/ वरिष्ठ लिपीक | उपअभियंता (क्षे.का.क्र.१ ते ४) | कार्यकारी अभियंता (पापु व जनि) |
| २४ | विद्युत/वाहन व यांत्रिकी विभाग | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता (यांत्रिकी) | संबंधित उपआयुक्त |
| २५ | मालमत्ता विनियोग व व्यवस्थापन विभाग | लिपिक | अधिक्षक तथा वरीष्ठ लिपीक | संबंधित उपआयुक्त |
| २६ | मध्यवर्ती भांडार विभाग | वरिष्ठ लिपीक | अधिक्षक | संबंधित उपआयुक्त |
| २७ | नगररचना विभाग | उप अभियंता/ आरेखक/इमारत निरीक्षक/वरिष्ठ लिपिक | नगररचनाकार | सहा.संचालक नगररचनाकार |
| २८ | अतिक्रमन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण व निर्मुलन विभाग | अधिक्षक तथा वरिष्ठ लिपिक/लिपिक | अतिक्रमन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण व निर्मुलन अधिकारी | संबंधित उपआयुक्त |
| २९ | गुंठेवारी विभाग | लिपिक तथा रोड कारकुन | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता |
| ३० | कोंडवाडा विभाग | लिपिक | विभागप्रमुख | संबंधित उपआयुक्त |

या आदेशाच्या दिनांकास यापूर्वी ज्या जनमाहिती अधिका-याकडे माहिती अधिकारातील प्रलंबीत प्रकरणे आहेत ती सर्व प्रकरणे माहितीसह नविन सहाय्यक जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी यांचेकडे तात्काळ सुपुर्द करुन माहितीचे विवरण सामान्य प्रशासन विभागाकडे द्यावे.

तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी विभागाकडे प्राप्त होणारे माहिती अधिकार २००५ अंतर्गत अर्ज तसेच अपील अर्ज याबाबतची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर करुन **जनमाहिती अधिकारी यांनी प्रत्येक आठवड्याच्या दर मंगळवारी आढावा बैठक घेऊन प्रकरणे निकाली काढावीत.**

जनमाहिती अधिकारी यांनी विभागात प्राप्त होणा -या अपिल प्रकरणात प्रत्येक महिण्याच्या दुस-या मंगळवारी सर्व अपीला बाबतची आढावा बैठक घेऊन **प्रत्येक महिण्याच्या दर बुधवारी अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील प्रकरणाची सुनावणी घेण्यात यावी. अपील प्रकरणाच्या सुनावणीसाठी स्वत: जनमाहिती अधिकारी यांनी अपीलीय अधिकारी यांचेकडे माहितीसह व अर्जदाराला दिलेल्या उत्तरासह उपस्थित राहावे.** अपिलाचे सुनावणीचे वेळेस अपिलार्थीनी मागणी केलेल्या माहितीची संचिका, अभिलेखे संबंधीत अपिलार्थीस माहिती अधिकारा अंतर्गत मागणी प्रमाणे देण्यात आलेल्या माहितीसह उपस्थित राहावे.

तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकारातील प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रतिमहा शासनाकडे याबाबत पाठविण्यात येणा-या विहित प्रपत्रात माहिती भरुन दर महिण्याच्या १ तारखेस सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावे.

माहिती अधिकारा अंतर्गत राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणा-या द्वितीय अपील प्रकरणातील सर्व संचिका, अभिलेखे व्यवस्थितपणे ठेवावेत जेणे करुन मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे द्वितीय अपिल सुनावणीच्यावेळी संबंधीत जनमाहिती अधिकारी यांना माहिती देणे सोईचे होईल.

तसेच माहिती अधिकारातील प्राप्त होणारे अर्ज एक खिडकी योजना कक्षाद्वारे स्विकारण्यात येतील. सदर कक्षातील नियुक्त कर्मचा-यांनी प्रत्येक महिण्यास प्राप्त होणा-या माहिती अर्ज व अपील अर्जा बाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे विभाग निहाय सादर करावा.

सदरील आदेशाची अंमलबजावणी तात्काळ परिणामाने व्हावी.

स्वाक्षरीत/-
(डॉ.महेशकुमार डोईफोडे)
आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:-**
मा.उपसचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

**प्रतिलीपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

१) संबंधित विभाग प्रमुख / शाखा प्रमुख, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
२) सर्व जनमाहिती अधिकारी / अपीलीय अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
भांडार ३) अधिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देऊन आदेशीत करण्यात येते की, आदेशात नमुद केल्यानुसार यापुर्वी बनविण्यात आलेल्या ०७ बोर्ड तयार करुन मुख्य कार्यालय व सर्व झोन कार्यालयास देण्यात यावे.
४) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, मनपा नांदेड यांना सुचित करण्यात येते की, सदर आदेश महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावी.
५) संबंधितांना (नावाने)
६) नोटीसबोर्ड

(डॉ.महेशकुमार डोईफोडे)
आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड